# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

## प्रेसनोट क्र.७०१ दिनांक १२.०९.२०२०

**१. माणिकपुर पोलीस ठाणे गुन्हा.रजि.क्र.। २९९/२०२० भादविसं कलम ४२० प्रमाणे,**

फिर्यादी पुरुष वय २१ वर्षे, व्यवसाय-व्यापार, रा.ता.वसई, जि.पालघर, यांनी फिर्याद दिली की, दि.०९/०९/२०२० रोजी १६.०० वाजता ते १०/०९/२०२० रोजी १९.०४ वाजता चे दरम्यान, यातील आरोपीत मोबाईल नंबर धारक ८८७६४०३२१२, ८९६०३४०६२८,७४६६८८२५५१ यांनी फिर्यादीचे मो नं.-८४४६९७७५८६ वर फोन करुन ते आर्मी ऑफीस वाकोला,मुंबई येथुन बोलत आहेत असे सांगुन त्यांना ४० किलोचे ७५ बॅग वालपुट्टी पाहीजे. त्यानंतर आप मुझे पहीले ५ रुपये सेंड करो उसके बाद मैं आप को बिल के सहीत आपके पाच रुपये रिफन्ड कर दुँगा, त्यावर फिर्यादीने गुगल पे नं. ८४४६९७ ७५८६ वरुन फोन पे आयडी liccard8811@ybl यावर पाच रुपये पाठविले काही वेळाने सदर मोबाईल नंबर धारक याने फिर्यादीचे गुगल पे. नं.८४४६९७७५८६ वर १० रुपये पाठवुन ही आर्मीची पध्दत आहे असे बोलुन फिर्यादीचा विश्वास संपादन करुन फिर्यादी कडुन वेळोवेळी फोन पे, गुगल पे व एनईएफटी द्वारे एकुण १,९७,२९९/- रुपयाची फसवणुक केली म्हणुन गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

पालघर जिल्हयातील सर्व नागरीकांना पोलीस दलाकडुन आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारच्या आमिषास बळी न पडता संबधीत व्यक्ती किंवा कंपनीबद्दल सविस्तर माहीती प्राप्त करुन आर्थिक व्यवहार करावा.

**२. अर्नाळा पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र.। ३२३/२०२० भा.द.वि.सं. कलम ४२० प्रमाणे.**

फिर्यादी महिला वय ३५ वर्षे, व्यवसाय-गृहिणी, रा.विरार पश्चिम, यांनी फिर्याद दिली की, दि. ११/०९/२०२० रोजी १३.२९ ते १४.४४ वाजताच्या दरम्यान यातील फिर्यादी यांचे व त्यांचे आईचे बँक ऑफ बडोदा शाखा सायन पश्चिम मुंबई येथे दोघीत खाते असुन त्या खात्यातुन अनोळखी इसम यांचा फिर्यादी यांचे मोबाईलवर फोन येवुन फिर्यादी व त्यांची आईचे खाते बरेच दिवस झाले असतांना त्याचेत कोणताही व्यवहार होत नाही असे सांगुन ते पुन्हा चालु करणे करीता फिर्यादी यांना ओटीपी नंबर पाठविण्याचा गळ घालुन सदर खात्यामधुन २,१८,२६८/- रुपये दि.११/०९/२०२० रोजी १३.२९ ते १४.४४ वाजताच्या दरम्यान ऑनलाईन डेबीट करून घेवून फिर्यादी यांची फसवणुक केली आहे म्हणुन गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

पालघर जिल्हयातील सर्व नागरीकांना सायबर पोलीस दलाकडुन आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारच्या नविन फसवणुकीच्या घटना घडत असुन आपले बँक संबधीत माहीती कोणालाही देऊ नका. कोणतीही बॅक आपणास फोनव्दारे तुमचे बॅक खाते, एटीएम कार्ड किंवा संबधीत माहीती विचारत नाही. अशा प्रकारची माहीती आपणास कोणी विचारल्यास तात्काळ आपले बॅक किंवा पोलीस ठाणे यांचेशी संपर्क साधावा.

**३. वाणगांव पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र.I ६०/२०२० भादंविक ३४१, ३८५, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७, १४९, ४२७ प्रमाणे,**

फिर्यादी पुरुष वय ४५ वर्षे, व्यवसाय-ॲश (राख) ट्रान्सपोर्टींग, रा.डहाणु गाव, यांनी फिर्याद दिली की, दि. ११/०९/२०२० रोजी सकाळी १०.०० वा. ते १२.३० वा.जे. दरम्यान आसनगाव ॲश पॉंड मध्ये व स्मशानभुमी जवळ ता.डहाणु जि.पालघर येथे यातील तक्रारदार यांचा राख भरलेला डंपर स्मशानभुमी जवळुन जात असताना यातील आरोपीत १) भुपेंद्र उर्फ भरत मोरेश्वर कोरे, २) कुणाल सुभाष राऊत, ३) प्रमोद तुकाराम पाटील, ४) संजय भालचंद्र राऊत, ५) प्रतिक जगदीश दळवी, ६) जितेंद्र दिनकर राऊत, ७) नितेश प्रभाकर पाटील, ८) हेमंत हिराजी राऊत, ९) रोशन पाटील, १०) शुभम भुपेंद्र कोरे व इतर ४ ते ५ इसम सर्व रा. आसनगाव ता. डहाणु जि. पालघर यांनी डंपर अडवुन उभा करुन सदर ठिकाणी ॲश पॉंड मध्ये काम करीत असलेला जेसीबी ऑपरेटर रामबदन बैचेन यादव रा. बोईसर ता. जि. पालघर यास जबरदस्तीने जेसीबी सह आणुन यातील साक्षीदार  राजकुमार ठाकुर यास ॲश पॉंड स्टॉक केलेल्या राखेच्या प्रत्येक डंपर मागे १००/- रुपये व त्यानंतर सिजन चालु झाल्यावर प्रत्येक डंपर मागे २००/- रुपये दया, नाहीतर राख लोडींगचे काम आमच्याकडे दया, असे बोलुन खंडणी मागुन मोटार डंपर नं. जीजे-१५-युयु-८८८५ च्या हेड लाईड फोडुन नुकसान केली म्हणुन गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.